# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः18.04.2024 वारःगुरुवार

---

1. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी प्रचाराची सांगता. 17 राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधल्या 102 मतदारसंघांमध्ये उद्या मतदान. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभेसाठीही उद्या मतदान.
2. लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार
3. अयोध्येसह देशभरात रामनवमी उत्साहात साजरी.
4. भारताची लोकसंख्या जगात सर्वांत जास्त म्हणजे एक अब्ज 44 कोटींपर्यंत गेल्याचा संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीचा अंदाज आणि
5. तेराव्या युरोपियन मुलींच्या गणित ऑलिंपियाडमध्ये पुण्याच्या सई पाटीलसह भारताला चार पदकं.

<u>**लोकसभा-प्रचार**</u>

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीचा प्रचार काल संपला. या टप्प्यात उद्या 17 राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधल्या 102 मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, अंदमान आणि निकोबार, लक्षद्वीप, पुदुच्चेरी, उत्तराखंड आणि तमिळनाडूमधल्या सगळ्या लोकसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होईल. याशिवाय राजस्थानमधल्या 12, उत्तर प्रदेशातल्या आठ, मध्य प्रदेशातल्या सहा, आसाम आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी पाच, पश्चिम बंगालमधल्या तीन, मणिपूरमधल्या दोन, तसंच छत्तीसगड, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधल्या प्रत्येकी एका मतदारसंघामध्ये मतदारांचा कौल मतपेटीत बंद होईल. या टप्प्यात 625 उमेदवार रिंगणात आहेत. केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, तेलंगणचे माजी राज्यपाल तमिलीसाई सुंदरराजन, भारतीय जनता पार्टीचे तमिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई, कर्नाटकमधले कॉंग्रेसचे नेते कार्ती चिदंबरम, द्रमुकचे नेते दयानिधी मारन यांच्यासह अनेक दिग्गजांचं भवितव्य उद्या निश्चित होणार आहे. प्रचाराच्या कालच्या शेवटच्या दिवशी प्रचार मोहीम शिगेला पोचली होती. पंतप्रधान आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल त्रिपुरातल्या आगरताळा इथं आणि आसाममधल्या नलबारीत सभा घेतल्या. कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांनी कर्नाटकात मंड्या इथं सभेला संबोधित केलं. त्यांनी आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशातल्या गाझियाबाद इथं संयुक्त पत्रकार परिषदही घेतली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल कॉंग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी आसाममधल्या सिलचर इथं प्रचार सभा घेतली. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याबरोबर अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभांसाठीही शुक्रवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यासाठीही जय्यत तयारी करण्यात आली आहे.

<u>**राजीवकुमार आवाहन**</u>

दरम्यान, मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा आणि लोकशाहीचं उत्तरदायित्व दाखवून द्यावं असं आवाहन मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी केलं. आकाशवाणीशी बोलताना राजीवकुमार म्हणाले, की देशातल्या नागरिकांच्या सक्रीय सहभागामुळंच अनेक निवडणुका आत्तापर्यंत सुरळीतपणे आणि नियमितपणे पार पडल्या आहेत. निवडणुका ही देशाच्या लोकशाहीची अतिशय सुंदर अभिव्यक्ती असल्याचं त्यांनी सांगितलं आणि युवकांनी निवडणूक सहभागाच्या क्रांतीचं नेतृत्व करावं, असं आवाहन केलं.

<u>**अधिसूचना**</u>

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार आहे. या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या 96 मतदारसंघांमध्ये तेरा मे रोजी मतदान होणार आहे. आंध्र प्रदेशात एकाच टप्प्यात होणाऱ्या

विधानसभा निवडणुकीसाठी आणि ओडिशातल्या विधानसभा निवडणुकीसाठी 28 मतदारासंघांमध्ये होणाऱ्या पहिल्या टप्प्यासाठीही उद्या अधिसूचना जारी होईल. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया शुक्रवारी संपेल. या टप्प्यात 94 मतदारसंघांमध्ये सात मेला मतदान होणार आहे.

**<u>भारत लोकसंख्या</u>**

भारताची लोकसंख्या जगात सर्वांत जास्त असून, ताज्या अंदाजानुसार, ती एक अब्ज 44 कोटींपर्यंत गेली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या निधीच्या म्हणजे यूएनएफपीएच्या अहवालानुसार चीनची लोकसंख्या जगात दुसऱ्या क्रमांकावर म्हणजे एक अब्ज 42 कोटी इतकी आहे. भारतातील माता मृत्यू प्रमाणात घट, तसंच सामाजिक आणि आर्थिक स्थितीत झालेली सुधारणा यांमुळे लोकसंख्येत वाढ होत असल्याचं निरीक्षण यूएनएफपीएनं नोंदवलं आहे. भारताची लोकसंख्या 2011च्या जनगणनेनुसार, एक अब्ज 21 कोटी इतकी होती. चीनची लोकसंख्या 2022 मध्ये एक अब्ज 42 कोटी 60 लाख इतकी होती. मात्र, त्यानंतर तिच्यात घट व्हायला सुरुवात झाली. भारताच्या लोकसंख्येनं एप्रिल 2023 मध्ये चीनच्या लोकसंख्येशी बरोबरी केली. चीनची लोकसंख्या या शतकाच्या अखेरीपर्यंत एक अब्जांच्याही खाली जाऊ शकेल, असा या क्षेत्रातल्या तज्ज्ञांचा अंदाज आहे, तर भारताची लोकसंख्या पुढच्या काही दशकांमध्ये वाढत राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**<u>पांडे-उझबेकिस्तान</u>**

लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काल उझबेकीस्तानमध्ये लष्करी दल अकादमीत उच्च माहिती-तंत्रज्ञान प्रयोगशाळेचं उद्घाटन केलं. भारताच्या सहयोगातून ही प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. उभय देशांच्या संरक्षणमंत्र्यांच्या सप्टेंबर 2018मध्ये झालेल्या चर्चेत भारतातर्फे अशी प्रयोगशाळा उभारण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं. या प्रयोगशाळेत उच्च तंत्रज्ञानाचा समावेश असून, उझबेकीस्तानमधल्या संरक्षण दलाला प्रशिक्षणासाठी तिचा विशेषकरून उपयोग होणार आहे.

**<u>रामनवमी</u>**

देशभरात काल रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. मंदिरातल्या पारंपरिक रामजन्म सोहळ्यासह मिरवणुका, धार्मिक कार्यक्रम, प्रसादवाटप आणि इतर अनेक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. अयोध्येतल्या श्रीरामजन्मभूमी मंदिरात पहिल्याच सूर्यतिलक समारंभासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. काल दुपारी बारा वाजून 16 मिनिटांनी रामलल्लांच्या कपाळावर सूर्याची किरणं पडली आणि भाविकांनी एकच जल्लोष केला. शास्त्रज्ञांनी चार वर्षं घेतलेल्या मेहनतीतून हा सोहळा साकार झाला. श्रीरामसंकीर्तन आणि वेदमंत्रांचा जयघोष यांमुळे विज्ञान आणि अध्यात्म यांचाही संगम झाल्याचं बघायला मिळालं. जम्मू-काश्मिरात वेष्णोदेवी मंदिरात नऊ दिवस चाललेल्या शतचंडी महायज्ञाची काल रामनवमीला सांगता झाली. चैत्र नवरात्रीच्या निमित्तानं सुमारे तीन लाख भाविकांनी वैष्णोदेवीचं दर्शन घेतल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. महाराष्ट्रात अनेक मंदिरांमध्ये पारंपरिक उत्साहात रामनवमी साजरी करण्यात आली. नाशिकच्या काळाराम मंदिरात महाआरती आयोजित करण्यात आली होती. गोराराम मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. शिर्डीत रामनवमीच्या निमित्तानं पूर्ण रात्रभर मंदिर खुलं ठेवण्यात आलं होतं. इतर ठिकाणीही अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

**<u>काश्मीर हत्या</u>**

काश्मिरात काल अनंतनाग जिल्ह्यातल्या बिजबेहरा भागात दहशतवाद्यांनी बिहारमधल्या एका मजुराची गोळ्या घालून हत्या केली. राजू शाह असं मृताचं नाव आहे. गोळीबारानंतर पोलिसांनी शाह यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं मात्र, तिथं त्यांना मृत घोषित करण्यात आलं. या घटनेनंतर सुरक्षा दलांनी त्या परिसरात नाकाबंदी केली असून दहशतवाद्यांना पकडण्यासाठी मोठी शोधमोहीम राबवण्यात येत आहे.

**<u>जळगाव-आग</u>**

महाराष्ट्रात जळगाव शहरातील डब्ल्यू-सेक्टर मधील मोरया केमिकल कंपनीला लागलेल्या भीषण आगीत काल दोन जणांचा मृत्यू झाला, तर 22 कामगार होरपळले आहेत. पाच जणांची प्रकृती गंभीर आहे. जखमींमधील काहींना खासगी, तर काहींना जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव

पाटील आणि मंत्री गिरीश महाजन आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी घटनास्थळाला आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रूग्णांची भेट घेतली. कंपनीचे मालक आणि व्यवस्थपकाविरुद्ध मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

**गणित**

तेराव्या युरोपियन मुलींच्या गणित ऑलिंपियाडमध्ये भारतानं दोन रौप्य आणि तीन कास्य पदकं पटकावली आहेत. जॉर्जियामध्ये त्साकाटुबो इथं ही ऑलिंपियाड आयोजित करण्यात आली होती. तिरुअनंतपुरम इथल्या संजन चाको आणि गुडगावमधल्या गुंजन आगरवालनं रौप्य, तर हिस्सारच्या लारिस्सा आणि पुण्याच्या सई पाटीलनं कास्य पदक मिळवलं आहे. भारतानं 2015पासून या स्पर्धेत भाग घ्यायला सुरुवात केल्यानंतर दुसऱ्यांदा पथकातल्या चारही स्पर्धकांना पदक मिळालं आहे. भारताच्या पथकाचं नेतृत्व साहिल म्हसकर यांनी केलं तर चेन्नई गणित संस्थेच्या अनन्या रानडे निरीक्षक म्हणून सहभागी झाल्या होत्या.

**उष्णतेची लाट**

पुढच्या चार दिवसांमध्ये ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये उष्णतेची लाट तीव्र होण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे. झारखंड, उत्तर कोकण, सौराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीचा भाग, तेलंगण, तमिळनाडू आणि पुदुच्चेरीमध्येही उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. देशाच्या पूर्व तसंच दक्षिण भारतातल्या किनारपट्टीच्या भागांमध्ये कमाल तापमान दोन ते तीन अंश सेल्सिअसनं वाढेल, असं हवामानशास्त्र विभागानं म्हटलं आहे. ईशान्य भारतात पुढच्या रविवारपर्यंत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.